


दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA




vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार १४ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २११ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# ६५०० रुपयांवरुन आता थेट महिन्याला १५ हजार पगार मिळणार, शिंदे सरकारचं पोलीस पाटलांना मोठं गिफ्ट

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्याच्या हितासाठी 25 पेक्षा जास्त महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले**



राज्यभरातील पोलीस पाटलांच्या पगारात वाढ करण्यात आली आहे. पोलीस पाटलांना आतापर्यंत 6500 रुपये पगार प्रतिमहिना मिळत होता. हाच पगार आता 15000 रुपयांवर करण्यात आला आहे. पोलीस पाटलांच्या मानधनात भरीव वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. आता पोलीस पाटलांना महिन्याला १५ हजार रुपये मिळतील. सध्या पोलीस पाटलांना ६५०० रुपये मिळतात. पोलीस पाटलांचे कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांमध्ये वाढ झाली असून त्यांना सध्या देण्यात येणारे मानधन कमी असल्याने हा निर्णय घेण्यात आला. सध्या पोलीस पाटलांची ३८ हजार ७२५ पदे असून मानधनात वाढ केल्यास ३९४ कोटी ९९ लाख रुपये वार्षिक खर्च वाढेल. या खर्चासही मान्यता देण्यात आली. मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस मान्यता, ३५ गावांना लाभ होणार

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील उपसा सिंचन योजनेस मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या योजनेमुळे १७ हजार १७८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊन ३५ गावांना लाभ होईल. यासाठी ६९७ कोटी ७१ लाख खर्चास देखील मान्यता देण्यात आली.

मानसेवी वैद्यकीय अध्यापकांचे मानधन वाढविले राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद महाविद्यालयामधील मानसेवा (निकत) अध्यापकांना देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. भविष्यात नियुक्त होणाऱ्या अध्यापकांना देखील सुधारित मानधन लागू होणार आहे. नव्या निर्णयानुसार प्राध्यापकांना 30,000 रुपये तर सहयोगी प्राध्यापकांना 25,000 रुपये मानधन मिळणार आहे. मानसेवी अध्यापकांच्या मानधनात 1997 पासून म्हणजेच 26 वर्षांपासून कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याने हा निर्णय घेण्यात आला. महानंद दूध संघाची स्थिती सुधारणार महानंद या सहकारी दुध क्षेत्रातील शिखर संस्थेच्या बळकटीकरणासाठी संस्थेचे व्यवस्थापन पुढील 5 वर्षांसाठी राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाकडे सोपविण्यास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. महानंदाच्या पुनर्वसन योजनेसाठी शासन व NDDB यांच्यामध्ये आवश्यक तो करारनामा करण्यात येणार आहे. महानंद हा ब्रॅण्ड महाराष्ट्रातील शेतकरी व ग्राहकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे या संस्थेच्या पूनर्जीवनासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (NDDB) यांनी व्यावसायिक दृष्टीकोन व सहकारी तत्त्वांचा अवलंब करून पुनरुज्जीवन व सक्षमीकरण करणे अपेक्षित आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (NDDB) च्या प्रकल्प अहवालानुसार पुढील 5 वर्षात महानंद ही रू. 84.00 कोटी इतक्या नफ्यात येईल अशी अपेक्षा आहे.

## लोकसभा निवडणूक

### चार वेळा खासदार, वडिलांऐवजी मुलाला उमेदवारी,



महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवा ट्विस्ट आला आहे. कारण भाजपकडून महाराष्ट्रातील आगामी लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. भाजपकडून महाराष्ट्रातील एकूण 20 उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीच्या माध्यमातून भाजपने धक्कातंत्राचा अवलंब केल्याचं बघायला मिळत आहे. भाजपने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी पक्षाच्या विद्यमान 4 खासदारांचं तिकीट कापलं आहे. यामध्ये उत्तर मुंबईचे खासदार गोपाळ शेट्टी, मुंबई उत्तर पूर्वचे खासदार मनोज कोटक, जळगावचे खासदार उन्मेश पाटील आणि बीडच्या खासदार प्रीतम मुंडे यांचा समावेश आहे. गोपाळ शेट्टी यांच्याजागी पियूष गोयल यांना संधी देण्यात आली आहे.

### भाजप हायकमांडचा दणका, थोडी खुशी थोडा गम



महायुतीच्या जागावाटपावरुन वेगवेगळ्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु असताना आज भाजपने लोकसभेच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे या यादीत महाराष्ट्रातील तब्बल 20 उमेदवारांची नावे आहेत. या यादीत काही नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. तर 4 विद्यमान खासदारांचं तिकीट कापण्यात आलं आहे. त्यामुळे या चारही खासदारांना मोठा झटका बसला आहे. भाजपकडून लोकसभा निवडणुकीसाठी पंकजा मुंडे, मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना संधी देण्यात आली आहे. तसेच भाजप नेत्या स्मिता वाघ यांनादेखील संधी देण्यात आली आहे.

**पवारांना संपवण्याचा दुर्मिळ योगफ, टॅगलाईन घेवून गाड्या निघाल्या आणि: शिंदे गटाच्या नेत्याची पुढची व्यूहरचना काय?**



बारामती लोकसभा मतदारसंघात आता खऱ्या अर्थाने चुरस निर्माण झालीय. अजित पवार यांनी शरद पवार यांच्याशी फारकत घेतली. पत्नी सुनेत्रा पवार यांची बारामती लोकसभेचे उमदेवार म्हणून घोषणा केली. त्यामुळे बारामतीमध्ये विद्यमान खासदार सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार अशी लढत होण्याची चिन्हे आहेत. अजितदादा यांच्यामागे शिंदे गट आणि भाजपची ताकद येण्याची शक्यता होती. मात्र, अजितदादा यांना शिंदे गट आणि भाजपची रसद मिळणार का अशी शंका निर्माण झालीय. याचे कारण म्हणजे बारामती लोकसभा मतदारसंघातील दोन माजी मंत्र्यांनी अजितदादा यांच्याविरोधात घेतलेली उघड भूमिका...

## मुक बधीर विद्यार्थ्यांसमवेत कामगार नेते सुरेश पाटील यांचा वाढदिवस साजरा.

**दैनिक वादळ वार्ता उरण/विठ्ठल ममताबादे**

भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री,कामगार नेते सुरेश पाटील यांचा वाढदिवस मुक बधीर विद्यार्थी यांच्या समवेत पंढरपूर येथे साजरा करण्यात आला.भारतीय मजदूर संघाचे त्रिवार्षिक अधिवेशन पंढरपूर येथे आयोजित केले होते या अधिवेशनाच्या आयोजनासाठी सुरेश पाटील हे पंढरपूर येथे आपल्या वाढदिवसाच्या दिवशी उपस्थित होते.त्या निमित्ताने त्यांनी पंढरपूरच्या पांडुरंगाचे दर्शन घेऊन पंढरपूर येथील वै.रखुमाबई भीमराव शिंदे या मूकबधिर वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना आपल्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक




साहित्याचे वाटप व रोख रक्कम देणगी म्हणून दिली. सुरेश पाटील हे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई या शाळेचे शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष असून ते या विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी वही व पेन भेट वस्तू देऊन विद्यार्थ्यांचा वाढदिवस शाळेत साजरा करतात.या कार्यक्रमात रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख, डी.पी सोनवणे, मधुकर पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.त्यांच्या या सेवाभावी व स्तुत्य उपक्रमाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मनोज पाटील यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्रदान.

**दैनिक वादळ वार्ता उरण/विठ्ठल ममताबादे**

महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार उरण तालुक्यातील पाणदिवे गावातील सामाजिक कार्यकर्ते मनोज पाटील यांना मंगळवारी प्रदान करण्यात आला. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय जाती कल्याण, शारीरीक व मानसिकदृष्ट्या अपंग, कुष्ठरोगी आदींसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात येतो.



सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, रोख १५ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. नरिमन पॉईंट येथे झालेल्या या पुरस्कार वितरण कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यावेळी उपस्थित होते. पाटील यांनी महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान पाणदिवे या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून २५ वर्षे विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. सुधागड एज्युकेशन सोसायटी कळंबोली शाखेत ते कार्यरत आहेत. गेल्या वर्षी त्यांना शैक्षणिक कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारांने गौरविण्यात आले होते.

## पोलीस पाटील पदी निवड झाल्याबद्दल प्रीती शिंदे (उपासे) यांचा सत्कार..





**दैनिक वादळ वार्ता सोलापूर/विश्वास चोपडे**

]शिंगेवाडी (ता. माढा ) येथील प्रीती सचिन शिंदे (उपासे) पोलीस पाटील पदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने सत्कार संपन्न झाला या कार्यक्रमासाठी गावचे सरपंच सौ अर्चना सोनवणे,उपसरपंच चारुशीला शिंदे,धनश्री शिंदे,प्रमिला शिंदे,सोनाली शिंदे, गीता गरदडे, शहाजी आबा शिंदे,निवृत्ती शिंदे दिलीप गडदे,अर्जुन शिंदे,बिभीषण शिंदे,समाधान शिंदे, नागेश शिंदे,शंकर शिंदे, राजेंद्र शिंदे, वसंत शिंदे, दत्तात्रय शिंदे,विठ्ठल खरात, हनुमंत शिंदे, लक्ष्मण मुरलीधर शिंदे, आप्पा शिंदे, वर्धमान शिंदे, शिवाजी सोनवणे, संतोष परबत, संतोष निकम, परमेश्वर गोडगे तात्या निकम बापूराव शिंदे सचिन शिंदे, वैभव शिंदे आदी ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते. या निवडीबद्दल गावातील ग्रामस्थांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. प्रीती शिंदे (उपासे) पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मी सदैव सेवेमध्ये आहेत त्यामुळे आज या ठिकाणी मला आनंद होतोय की शिंगेवाडी या माझ्याच गावात मला सेवेची संधी मिळाली आणि या सेवेतून गावातील लोकांना दुजाभाव होणार नाही कागदपत्रे दाखले अशा कोणत्याही शासकीय कार्यात कोणाला अडचण येणार नाही याची काळजी घेईन व आपल्या सहकार्यातून शिंगेवाडी हे गाव तालुक्यात नव्हे तर जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात तंटामुक्त गाव शिंगेवाडी गाव आदर्श गाव बनवण्याचा माझा प्रयत्न असेल आपल्याच सहकार्याने कायदा व सुव्यवस्था बाबतीत एक उत्तम गावाचा आदर्श आपण समाजासमोर उभा करूयात एवढीच सदिच्छा.

# मराठा आरक्षण संवाद यात्रेसाठी बहुजन नेत्यांनी थोपटले दंड सादोळा येथे बहुजन नायक बाबुराव पोटभरे यांचे जंगी स्वागत

**वादळवार्ता/गेवराई**

माजलगाव( प्रतिनिधी ) मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने मनोज रंगे पाटील महाराष्ट्र संवाद यात्रा राबवत आहेत मराठाआरक्षण मुद्दा ओबीसी बांधवांच्या विरोधात नाही सत्तेच्या विरोधात आहे मराठा समाजातील गोरगरिबांना आर्थिक मागास असलेल्या मराठ्यांना आरक्षण मिळावे ही गोष्ट सरकार सोबत लावून धरत जरांगे पाटलांनी महाराष्ट्रभर संवाद यात्रा सुरू केली मराठा समाजाचा हाच मुद्दा लक्षात घेता गरीबो के मसीहा, बहुजन नायक बहुजन बादशहा बाबुराव जी पोटभरे साहेब यांनी मराठा आरक्षणासाठी लढत असलेल्या जरांगे पाटलाची खंबीर साथ देण्याचा निश्चय केला आहे या अनुषंगाने जरांगे पाटील लातूर दौऱ्यावर असताना ही मराठा आरक्षणाचे खिंड लढवण्याचे काम बाबुरावजी पोटभरे यांनी केल्याचे बीड जिल्ह्यात दिसून आले बाबुरावजी पोटभरे हे घटनेचे अभ्यासक आहेत बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसामान्यांसाठी रोटी कपडा और मकान आधी गोष्टींसाठी लढा दिला त्यांच्याच विचारावर पावले टाकत आजच्या घडीत सत्तेला लाथ मारून गोरगरीब मराठ्यांचा हक्कासाठी लढतात लढताना दिसतात बाबुरावजी पोटभरे साहेब स्वतःची टीम स्वखर्चाने घेऊन आज फिरताना दिसले त्यांच्यासोबत त्यांचे खंबीर साथीदार श्रीहरी नाना मोरे, भीमराव आप्पा टाकणकर, प्रदीप पटेकर आधी मावळे उपस्थित होते छत्रपती शिवाजी महाराज लढायला जाताना ज्याप्रमाणे आपल्या त्याकाळच्या शत्रू सोबत लढण्यासाठी अनेक सहकार्यांची साथ घेत होते त्याप्रमाणेच आजच्या हुकूमशाही सरकार विरोधातील खिंड लढवण्यासाठी सत्तेवर लाथ मारून सत्याची साथ देण्याचा मनोदय पोटभरे यांचा दिसून येत आहे महाराष्ट्रात एकीकडे



सत्ता चाखायला मिळावी म्हणून अनेक मराठा नेते एकनाथ शिंदे, फडणवीस, अजित पवार यांचे लागुल चालन करताना दिसतात फक्त बूट पॉलिश करणे बाकी आहे एवढी हुजरे गिरी मराठा नेत्याकडून दिसून येत असल्याने मराठा नेत्यावरील विश्वास मराठा तरुणाई कडून संपुष्टात येत आहे याचाच प्रत्यय आज सादोळा तालुका माजलगाव येथे पाहायला मिळाला बाबुरावजी पोटभरे टीम सह सादोळा गावात संवाद साधण्यासाठी येत आहेत हे पाहून त्यांच्या स्वागतासाठी गावातील लहान थोर महिला तरुण म्हातारे माणसं मोठ्या संख्येने उपस्थित राहील पोटभरे सारखा माणूस आमच्या न्याय हक्कासाठी लढा देत आहे हे पाहून अनेकांचा आनंद खूप मोठा होता सकल सादोंळा गाव स्वागतासाठी उपस्थित होता

## संपादकीय

### दोन स्वप्ने

मला खऱ्या अर्थाने आयुष्याला देता यावी अशी एक निश्चित उपमा सापडत नाहीये. जीवन म्हणजे अडचणीच्या चिखलातून उगवणारे कमळाचे आसन साक्षात संघर्ष आणि विजयाचा आधार जीवनातील गंध म्हणजे सुख,दुःखाने भरलेला आधारच. आनंदाचा ग्रंथ आणि मांगल्याची विणा या सर्व रंगांची मिलन झाल्यावर आयुष्याचे मूर्तीमंत सुंदर रूप आपल्यासमोर उभे राहते. मानवी आयुष्य हे अधांतर किंवा भौगोलिक सुखात फुलवता येत नाही त्याला मानसिक आणि भावनिक रंगाचा स्पर्श झाला की ती मोहकपणे फुलते. आयुष्य म्हणजे सर्व रंगांचे मिलन त्यातील एखाद्या रंगाचा जरी अभाव आला तरी जीवन नुसते कोरडे वाटेल. आयुष्यात सुखदुःखाच्या सुरांची साथ लाभली की हे सुर माणसाला विकासाकडे नेतात. मानवी मनावर विलसित असलेले सुख त्याला चंदेरी स्वप्नांची शीतलता ही प्रदान करते. माणसाच्या आयुष्यात कोणत्या गोष्टी सुखाचा रंग ठेवून जातील हे सांगता येणे तसं कठीणच माणूस आणि प्राणी या दोघांमध्ये केवळ बुद्धिमत्तेचा फरक नाही त्याही पुढे एक गोष्ट आहे. ती म्हणजे स्वप्न प्राणी स्वप्न पाहतात आणि सोडून देतात माणसाला स्वप्न पाहण्याचा वरदान जरी दिलं असलं तरी ते स्वप्न साकार करण्याचा सामर्थ्यही विधात्याने देऊ केले आहे. भावनेच्या रंगीबेरंगी डबेतून रंग घेऊन स्वप्नांची चित्र रेखाटायचे असते. आता आपण काढलेलं स्वप्नाचां प्रत्येक चित्र पूर्ण होतं असं नाही. काही स्वप्न पूर्ण झाली नाही म्हणून स्वप्नाचे चित्र रेखाटणे थाबवायचं छेः! अपूर्णत्वातही असतोच की न्यारा गंध प्रत्येक गोष्ट घडण्यामागे एक ठराविक असं कारण असतचं. विनाकारण काहीच घडत नाही. काही सुख ही हृदयावर आनंदाचा वसंत ठेवून जातात काही पूर्णत्वाला गेलेले स्वप्न हे माझ्या मर्मबंधात साठवून राहिलेला हर्षमयी अर्कच आहे. ज्यामुळे मला अपूर्णत्व मिळालेल्या स्वप्नांबरोबर लढण्याचा बळ मिळालं. स्वप्नांची एक मोठी गंमत असते ती म्हणजे ती लवकर पूर्ण होत नाही आणि आपण ठरवल्याप्रमाणे तो कधीच नाही. ते आपल्याला पळवतात आपल्यातील जिद्द तपासतात. शेवटी ज्या माझ्या माणसाकडे आपल्याला पुढे वास्तव्याला जायचे आहे त्याविषयी एवढी प्रतापी शहानिशा ते करून पाहतात. आणि स्वप्नांनाही हट्टी आणि लढणारी माणसे आवडतात त्यामुळे अशा व्यक्तींचे स्वप्न लवकर पूर्ण होतात. स्वप्नांवर फक्त प्रेम असून भागत नाही पुढे आपण त्यांची काळजी घेऊन आणि या स्वप्नांमुळे माझे आयुष्य किती बदलले हे सांगणारे शब्दही त्यांना हवे असतात. मला स्वप्न नेहमीच त्या मोहक तरुणीसारखे वाटतात जी आपले पाठमोरे सौंदर्य दाखवून पळून जाते, आणि तिला पाहण्याचा आणि स्पर्श करण्याच्या मोहात माणूस तिच्या मागे धावतो. ती स्वप्न हाती लागूपर्यंत तो काय थांबत नाही. स्वप्नांचे स्वर सापडले की जीवन संगीतमय होऊन जाते. तुम्ही क्षणभर असा विचार करून पहा की स्वप्न आपल्या आयुष्यात नाही निव्वळ या कल्पनेने माणसाचा विरस झाल्या वाचून राहणार नाही. आता स्वप्न ही दोन प्रकारची असतात एक पाहिलेली आणि दुसरी दिलेली आता यात जी दुसरी स्वप्न आहे ती आपल्याला मिळतात; म्हणजे कोणी स्वप्न वाटणारा जादूगर ती आपल्या उशीवर रोज रात्री न चुकता ठेवून जातो. आपली संपूर्ण रात्र त्या बिलोरी स्वप्नांची असते. तिला कोणी चोरू शकत नाही. ही स्वप्ने गमतीदार सुखवणारी असतात. त्यांची गंमत म्हणजे ते आपल्याला संपूर्ण जशीच्या तशी आठवत नाही. त्यातील काही भाग आपल्या लक्षात राहतो; पण याच स्वप्नातील काही क्षण हे इतके गमतीदार असतात की ते आपल्या संपूर्ण दिवसभर सोबती राहतात. जेव्हा आठवण काढू त्यात अडकू तेव्हा मनाला ते अलगद गुदगुल्या करतात. तर काही हुरहुर लावून जातात. पण ही स्वप्न सुखाचा आधार आहेत. यातील पहिली स्वप्न म्हणजे जी आपण दिवसा डोळ्यांनी पाहतो ही स्वप्न आपल्याला जीवनाची सुखी चित्रे डोळ्यासमोर ठेवून पाहिली जातात आणि ही स्वप्ने पूर्ण करण्याची सर्वस्व जबाबदारी ही आपलीच असते. आता पाहिलेली स्वप्न ही फक्त आपल्या स्वतःचीच असतात आणि दुसऱ्या कुणाचीही नसतात त्यामुळे ती जितक्या प्रांजळपणे पाहिली जातात ती साकारण्यासाठी तेवढाच घाम काढावा लागतो. शेवटी संघर्ष चुकवून कोणतेही स्वप्न पूर्ण होणार नाही. संघर्षाला पर्याय नाही म्हणून,न स्वप्नांच्या रथाचा सारथी हा संघर्षच असतो. संघर्ष योग्य असला म्हणजे स्वप्नाची वाट चुकत नाही आणि विजय पताका आपलाच असतो. स्वप्न हे कधीच एकटे येत नाही. दिलेली अथवा मिळालेली स्वप्न आठवणींची लाट घेऊन येतात, मग ती लाट आठवांच्या पाण्याने भरली आहे की निव्वळ स्पर्शून जाणारा स्मृतीचा फेस आहे हे ती आल्याशिवाय कळत नाही. आपलं आपल्यासाठी पाहिलेले स्वप्न हे आपल्या संघर्षाची गाथा लिहत राहतो. प्रत्येक मागे पडणाऱ्या क्षणांबरोबर गोष्ट लिहत राहतात, म्हणून स्वप्नांच्या प्रवासा इतकं रंजक असं दुसरं काहीच नाही. माझ्यामते माणसांने आपल्या हक्काचा असे एखादं लहान मोठं का होईना पण एक स्वप्न पहावं,

# ग्राहक सक्षमीकरण काळाची गरज!

जो जन्माला आला तो झाला ग्राहकच! गुंतवणूकदार हासुद्धा ग्राहक आहे. त्याचा हक्कासाठी न्यायालयीन आव्हानात्मक लढा सुरू आहे. ग्राहकांना हक्काची जाणीव व्हावी आणि तो बाजारात खरेदीच्या हक्काबाबत सक्षम व्हावा, याकरिता विविध ग्राहक संघटना लोकांना जागरूक करीत आहेत. या सर्वांसाठी १५ मार्च हा दिवस खुप महत्त्वाचा आहे. हा दिवस जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आपल्या अधिकारांविषयी ग्राहकांना जागृती प्रदान करणारा अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा लेख... संपादक.

१५ मार्च हा दिवस संपूर्ण जगात जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा होत असतो. ग्राहकांना सेवा पुरवताना होणाऱ्या हलगर्जीपणामुळे सन १९६० साली अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीमध्ये ग्राहकांच्या प्रश्नांचा निचरा करण्यास एक व्यासपीठ तयार करण्यात आले. त्यासाठी जागतिक स्तरांवर पाठपुरावेही करण्यात आले. त्याला युनेस्कोनेही मान्यता दिली. त्यानुसारच दरवर्षी १५ मार्चला हा दिवस विश्वभरात साजरा केला जातो. ग्राहकाला अर्थव्यवस्थेचा राजा असे संबोधले जात असले, तरी त्याला मात्र बाजारपेठेत सतत अडवले, नाडवले अन् फसवलेही जातच असते. बिच्चाऱ्याची अपेक्षा तरी काय असते हो? आपण खरेदी करत असलेली वस्तू योग्य दर्जाची, योग्य गुणवत्तेची व वाजवी किमतीची असावी, एवढीच त्याची किमान अपेक्षा असते. पण त्याच्या नशिबी मात्र सतत अपेक्षाभंग आणि मनस्तापच! ग्राहकांचे होणारे शोषण थांबवून त्याच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी दि.२६ डिसेंबर १९८६ या दिवसापासून भारत सरकारने 'ग्राहक संरक्षण कायदा' अंमलात आणला. परंतु केवळ कायदा करून त्यामागील उद्दिष्ट साध्य होत नसते. हा कायदाही त्याला अपवाद नाही. कायदा अस्तित्वात येऊन ३६ वर्षे झालीत, पण थांबले का ग्राहकांचे शोषण? थांबली का त्यांची फसवणूक? कायद्याचा धाक, दरारा निर्माण व्हायला हवा असेल, तर तो ज्या घटकांसाठी केलेला आहे, तो घटक- ग्राहक आधी जागृत असायला हवा. कायद्याचे शस्त्र त्याला पेलता यायला हवे. अन्यथा निरक्षरांपुढे शेकडो उत्तमोत्तम ग्रंथ ठेवण्यासारखाच तो प्रकार होईल.

बाजारपेठेत दूध किंवा शीतपेय एमआरपीपेक्षा अधिक किमतीने घ्यावे लागते. भाजीवाला तराजूत वजनाऐवजी दगड ठेवतो. दुधात भेसळ होते. टॅक्सीवाल्यांची लुबाडणूक आपण निमूट सहन करतो. बिल्डर, फायनान्स कंपन्या, प्रवासी कंपन्या, वस्तूंचे उत्पादक आपल्याला फसवताहेत, हे सगळे का? कारण एकच, अजूनही आपल्यातील शोषणाविरुद्ध लढणारा खरा ग्राहक बाहेर येत नाही. ग्राहकांच्या हितसंबंधाचे अनुचित प्रथांपासून संरक्षण करणे हे आज ग्राहक चळवळीपुढील मोठे आव्हान आहे. त्यासाठी करावी लागणारी ग्राहक जागृती, वेळेप्रसंगी द्यावे लागणारे न्यायालयीन लढे हे सगळेच आव्हानात्मक आहे. कधी कधी तर ही लढाई असते एकट्याची. त्यासाठी वेळप्रसंगी ग्राहक संघटनांचीही मदत घ्यावी लागते, तर कधी ग्राहक संघटना व्यापक ग्राहकहीत लक्षात घेऊन प्रातिनिधिक लढे लढतात. परंतु त्यासाठी समाजातील प्रत्येक ग्राहकाचे सक्षमीकरण होणे काळाची गरज आहे. त्याकरिता गरज आहे ती फक्त इच्छाशक्ती आणि चिकाटीची.

भारतासारख्या विकसनशील देशात खऱ्या अर्थाने ग्राहक संरक्षण व्हायचे असेल तर ग्राहक प्रशिक्षण, ग्राहक प्रबोधन व ग्राहक जागृती होणे अत्यावश्यक आहे. अनेकविध समस्यांच्या चक्रव्युहात सापडलेल्या ग्राहकांचे प्रश्न अनंत आहेत. कामे ठेकेदाराला सुपूर्द करून प्रश्न सुटत नसतात. संप, बंद, मोर्चे, निदर्शने, रास्ता रोको यासारख्या आंदोलनानेही प्रश्नांची स्थायी स्वरूपाची उत्तरे मिळत नाहीत. ग्राहक संरक्षण कायद्याच्या आधारे काही प्रश्न सोडविता येतीलही, पण त्यालाही मर्यादा आहेतच. म्हणून आपले प्रश्न सोडविण्यास स्वतःच पुढाकार घ्यावा लागतो. स्वतःच स्वतःची शक्ती निर्माण करावी लागते अन् वाढवावीही लागते. त्याचसाठी हवे असते प्रशिक्षण, प्रबोधन व जागृती. शोषणमुक्तीचा तोच मूलाधार! ग्राहक चेतनेतून अपप्रवृत्तींवर अंकुश ठेवता येईल आणि हेच कार्य ग्राहक पंचायत ही स्वायत्त संस्था करीत आहे. ग्राहक एवं राजा मानणारी ग्राहक पंचायत ही विचाराधिष्ठित संघटना आहे. आज अर्थव्यवस्थेचे स्वरूप वेगाने बदलत आहे. सेल, एकावर एक फ्री, लॉटरी, कन्सेशन, बक्षीस, आदींच्या रूपाने नको त्या वस्तूंची अडगळ घरात वाढत आहे. भेसळयुक्त दूध, अन्न आणि औषधेसुद्धा पोटात जावून व्यक्तीसह समाजस्वास्थ्य बिघडत आहे. म्हणूनच असे वाटते की, ग्राहकराजा गुलाम होऊन आज बाजारात उभा आहे. हे चित्र बदलून त्याला खऱ्या अर्थाने राज्याभिषेक करायचे व्रत स्वीकारले. शोषणमुक्तीसाठी पुढाकार घेऊन ग्राहक संरक्षण कायदा करण्यास शासनाला भाग पाडले. या कायद्याने त्रिसदस्यीय न्यायासन अभिप्रेत आहे. त्यापैकी एक सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश हे न्यायासनाचे अध्यक्ष व उर्वरित दोन व्यक्तींपैकी एक स्त्री, अर्थ, कायदा, प्रशासन, व्यापार या क्षेत्रातील तज्ज्ञ असाव्यात, अशी तरतूद आहे.

या १५ मार्च आंतरराष्ट्रीय ग्राहक दिनाचे वेगळेच महत्त्व आहे. १५ मार्च १९६२ साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉन केनेडी यांनी अमेरिकन संसदेपुढे केलेल्या भाषणात तेथील ग्राहकांना त्यांचे- सुरक्षितता, माहिती, निवड आणि प्रतिनिधित्व हे चार हक्क प्रदान केले. त्यानंतरच्या कालावधीत ग्राहक संस्थांच्या जागतिक संघटनेने संयुक्त राष्ट्रसंघाशी चर्चा करून त्यांचा पाठपुरावा केला. त्यांत मूलभूत गरजा पुरविण्याचा हक्क, तक्रार निवारण्याचा हक्क, ग्राहक शिक्षणाचा हक्क आणि स्वच्छ पर्यावरणाचा हक्क, या आणखी चार ग्राहक हक्कांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. अशाप्रकारे हे आठ ग्राहक हक्क आज जगभर मान्य झाले आहेत.

ग्राहकांना गृहीत धरू नका, तो आहे म्हणून तुमचा व्यवसाय आहे. सेवा पुरवठादार कंपन्यांकडे वापरणाऱ्या ग्राहकांची विविध माहिती प्रचंड प्रमाणात जमा होते. ग्राहकांची खाजगी माहिती उघड करू नये. त्याचे बंधन कंपन्यांवर असावे. अवैध व्यावसायिकांवर कारवाई करावी. ग्राहक संरक्षण सुधारणा कायदा २०१९मध्ये आला. त्यात ग्राहक हक्काच्या अनेक तरतुदी आहेत. जाहिरातीत खोटे दावे करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे एफडीएला अधिकार आहेत. जाहिरातीतील दावे प्रमाणित करण्याची कंपन्यांना आवश्यकता आहे. नमूद केलेली सेवा कंपन्यांना द्यावीच लागेल. गोडाऊनमध्ये होणाऱ्या अवैध व्यवसायावर कारवाई करण्याची गरज आहे. नवीन सुधारित कायद्याची अंमलबजावणी व्हावी. केंद्राने २०१९मध्ये ग्राहक संरक्षण कायद्यात सुधारणा केली. पण त्याचे नियम तयार नाहीत. तातडीने अंमलबजावणी व्हावी. जिल्हाधिकाऱ्यांच्या ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्तीत राजकीय हस्तक्षेप नको. ग्राहकांना हक्काची जाणीव होऊन लोकशाही दिनाच्या तक्रारी वाढाव्यात. ग्राहकांच्या हक्कासाठी केंद्रात ग्राहक संरक्षण आणि अन्न पुरवठा मंत्रालय वेगवेगळे करावयास हवे. शासनाने प्रत्येक जिल्ह्यात ग्राहक संरक्षण कार्यालय उघडावे. राज्यात स्वतंत्र ग्राहक संरक्षण मंत्रालय स्थापन करावे. प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय उघडून आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांची त्यात नेमणूक करावी आणि ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीची जबाबदारी त्यांच्याकडे द्यावी. त्यामुळे ग्राहकांशी संबंधित तक्रारींना तातडीने न्याय मिळेल. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचातर्फे ग्राहकांना नियमाप्रमाणे ९० दिवसांपर्यंतही न्याय मिळत नाही. निकाल लागला तरी मात्र अंमलबजावणी काही होत नाही, हा एक जटील प्रश्न आहे!

आपण ग्राहक म्हणून वावरताना खुपदा प्राप्त अधिकारांची आणि हक्कांची पायमल्ली होते. अशावेळी ठामपणे, चिकाटीने अधिकारांची अंमलबजावणी करून घेण्याची गरज आहे. डिजिटल व्यवहार करणाऱ्या ग्राहकांची संख्या वेगाने वाढत आहे. मात्र या डिजिटल सेवा नीट समजून घेण्याची, त्यांचा वापर योग्यप्रकारे करण्याची आणि सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना हे दाखवून देण्याची खरी हीच वेळ आहे! !! विश्व ग्राहक हक्कदिन सप्ताहनिमित्त समस्त बंधुभगिनींना सचेतनात्मक हार्दिक शुभेच्छा !!

**अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉ. नं.**
**९४२३७१४८८३.**

# पत्रकार उत्तम हजारे यांचा रयत पुरस्काराने सन्मान

## - सिनेमा कलावंत, रिल्स स्टार यांच्या उपस्थितीत साजरा झाला रयत प्रतिष्ठानचा पुरस्कार सोहळा

**वादळवार्ता/बीड**

बीड :- बीडच्या रयत सामाजिक प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा बीडच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर न्याय भवनमध्ये मोठया थाटात साजरा झाला. यंदाच्या पुरस्कार सोहळयात सिनेमा क्षेत्रातील कलावंत ,रिल स्टार, इंन्सटाग्राम स्टार यांची रेलचेल या पुरस्कार सोहळयात बघायला मिळाली. मनोरंजन क्षेत्रातील कलावंता बरोबरच वकिल , डॉंक्टर, पत्रकार, नगरसेवक ,समाजसेवक, उद्योजक, संपादक, अश्या विवीध क्षेत्रातील मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला आहे. दैनिक लोकाशाचे निवासी संपादक उत्तम हजारे यांना रयत




पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कार सोहयासाठी सिनेमा क्षेत्रातील महेंद्र खिल्लारै , महादेव ( म्यडी) सवाई ,ज्योती जावळे, प्रविण वडमारे, एजाज शेख, संतोष वारे ,विलास सोनवणे, सुरेखा डोंगरदिवे, रणजित वाघमारे, प्रमोद रामदासी , दैनिक लोकांकितचे संपादक संजय पवार सर, जेष्ठ पत्रकार उत्तम हजारे ,नगरसेवक विकास जोगदंड साहेब असे कलाकार व मान्यवर उपस्थित होते तर शोशल मिडीयावर अल्पावधीतच रिल्स , इंन्सटाग्राम म्हणुन प्रसिद्धी झोतात आलेले अनेक कलावंत या सोहयात न्हाऊन निघाले आहेत, रयतच्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळयात अनेक दिग्गज मान्यवर पुरस्कार प्रदान करण्यासाठी उपस्थित होते . यामध्ये राजेश खर्डै ( नाखवा ) मुंबई , विठ्ठल मुर्केवार ( सेवा निव्रुत्त वरिष्ठ अधिकारी,रयतच्या संस्थापक अध्यक्ष रोहीणी ताई गणेश माने,कैलास दादा पठारै (जेष्ठ समाजसेवक ) , लक्ष्मण लटपटे ओ.बी.सी फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य, अँड अविनाश गंडले आदी मान्यवरांच्या हस्ते पार पडला .यावेळी रयत सामाजिक प्रतिष्ठानचे गणेश माने , जिल्हा अध्यक्ष संतोष कुराडे, गणेश तालखेडकर, प्रमोद रामदासी, रणजित वाघमारे, तुषार जाधव , मिनाक्षी देवकते व इतरांनी हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात महाराष्ट्र कौशल्य विकास केंद्राचा ऑनलाईन उद्घाटन कार्यक्रम संपन्न






माजलगाव -येथील भा. शि. प्र. संस्था अंबा जोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात महाराष्ट्र कौशल्य विकास केंद्राचा ऑनलाईन उदघाटन समारंभ राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला आहे. महाविद्यालयात या ऑनलाईन उदघाटन कार्यक्रमप्रसंगी जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे समन्व्यक बाळकृष्ण यादव, प्राचार्य डॉ सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ युवराज मुळ्ये, प्रा. संतोष लिंबकर,कार्यालय अधीक्षक उतरेश्वर आनेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र शासनाच्या या कार्यक्रमानुसार महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्राचे महत्व विशद करताना उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना म्हणाले की,21 वे शतक कौशल्याधारित रोजगाराचे युग आहे म्हणून कौशल्यप्रवण नवीन पिढीने होणे हे महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की, आज विद्यार्थ्यांमध्ये सॉफ्ट स्किल्स निर्माण होणे गरजेचे आहे. तसेच औद्योगिक केंद्राच्या गरजेनुसार प्रशिक्षण या केंद्रातून दिले जाईल तसेच वंचित- गरजु विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण यातून होईल. या ऑनलाईन कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्य उपस्थित होते.

# अनंतशाती संस्था व ई.एस.आय. प्रायव्हेट कडून खोतवाडी शाळेस संगणक संच भेट

**वादळवार्ता/कुडूत्री**

पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले स्मृती दिनाचे औचित्य साधून ई.एस.आय. प्रायव्हेट लिमिटेट पुणे व अनंतशांती बहुउद्देशिय सामाजिक सेवा संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने डोंगराळ व दुर्गम भागातीव विद्या मंदिर खोतवाडी (ता.पन्हाळा)येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस ३ संगणक संच भेट देण्यात आलेत.




कार्यक्रमात बोलताना अरूणा पाटील म्हणाल्या “ सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका व शिक्षिका होत्या त्यानी स्त्री शिक्षणाचा पाया रोवला अनेक संकटातून त्यांनी महिलाना शिक्षणाची वाटा खुल्या करून दिल्या. एकविसाव्या शतकात मुलींचा बौद्धिक विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शालेय जीवनापासुन त्यांना संगणक प्रशिक्षण गरजेचे असून शहरी भागात हे मिळते पण डोंगराळ व दुर्गम भागात या गोष्टीचा तुटवडा भासू नये यासाठी अनंतशांती बहुउद्देशीय सामाजिक सेवा संस्थेमार्फत विद्यार्थ्यांसाठी शाळेला संगणक भेट देत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमासाठी ई. एस. आय. कंपनीचे संदीप पाटील, अनंतशातीचे संस्थापक भगवान गुरव, अध्यक्षा माधुरी खोत, सचिव - अरुणा पाटील. संचालक मनोज माने, प्रशांत पाटील , वाय डी खोत , विकास खोत , सुरेश खोत,राजेंद्र खोत , कुणाल खोत सुभाष चौगले, तनुजा गुरव यांसह कार्यक्रमाच्या प्रंसगी ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.स्वागत मुख्याध्यापिका महानंदा पाटील यांनी केले. आभार माधुरी खोत यांनी मानले.

# आगरी समाजाची शान सागरी कन्या कुमारी सृष्टी मुंबईकर यमुना स्त्री सन्मान पुरस्काराने झाली

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

आगरी,कोळी समाज हा धाडशी वृत्तीचा दर्या सारंग समाज समुद्राच्या तुफान लाटांवर स्वार होऊन आपल्या बलदंड बाहूनीं आकाशाला गवसणी घालणारा हा राकट ,कणखर समाज आणि ह्याच धाडशी - जिगरबाज आगरी समाजातील रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील वेश्वी गावाची सागरी कन्या कुमारी सृष्टी राजश्री राजेंद्र मुंबईकर आज अथांग समुद्राला आपल्या कवेत सामावून घेण्याकरिता सरसावली आहे ती मर्चंड नेव्ही मेरी टाईम इंडस्ट्रीज ह्या क्षेत्रात जागतिक दर्जाच्या मर्क्स कंपनीच्या दळणवळणाच्या समुद्री जहाजावर सहा महिन्यांचे यशस्वी प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र प्राप्त करून मेरी टाईम इंडस्ट्रीजच्या जगभरातील प्रवासा करिता आणि संपूर्ण जगाच्या कानाकोपऱ्यातील समुद्रावर स्वार होण्याकरिता सीफेरर हा परवाना ( लायसेन्स)प्राप्त झालेली आगरी समाजातील पहिली सागरी कन्या कुमारी सृष्टी राजश्री राजेंद्र मुंबईकर हिने मर्चंड नेव्ही क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दाखल घेत तिला तिच्या भविष्यातील यशस्वी धाडशी प्रवासाच्या वाटचाली करिता प्रोत्साहित करून तिच्या पाठीवर कौतुकाची थाप देत जेष्ठ कामगार नेते आणि काँग्रेस जिल्हा अध्यक्ष महेंद्रशेठ घरत- अध्यक्ष यमुना सामाजिक ,शैक्षणिक संस्था शेलघर यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील एकूण १२ ( बारा ) महिलांना “यमुना स्त्री सन्मान पुरस्कार “ या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात आगरी समाजाची शान आणि रायगडचा अभिमान पहिली सागरी कन्या कुमारी सृष्टी राजश्री राजेंद्र मुंबईकर हिला तिने मर्चंड नेव्ही क्षेत्रात घेतलेल्या गगनभरारी कर्तृत्वाची दखल घेऊन “यमुना स्त्री सन्मान पुरस्कार “ देऊन गौरविण्यात आले.भारत देशात १३५ वर्षा नंतर पहिल्यांदाच मर्चंड नेव्ही क्षेत्रात जी.पी.रेटिंग मध्ये मुलींची भरती करण्यात आली.त्यात देशभरातून एकूण ३२०० मुलींमधून १९ मुलींची निवड करण्यात आली. त्यात रायगडची पहिली सागरी कन्या म्हणून उरण तालुक्यातील सृष्टी मुंबईकर हीने जी.पी.रेटिंग मध्ये अव्वल येत आपलं यशस्वी प्रशिक्षण पूर्ण करून येत्या पुढील महिन्यातच आपल्या उज्वल स्वप्नांची गगन भरारी घेत समुद्राला आपल्या कवेत सामावून घेण्याकरिता नेदरलँड कीव डेन्मार्क येथे रवाना होणार आहे. आणि हिच्या ह्याच अभिमानास्पद कामगिरी दखल घेत शेलघर येथील सुखकर्ता बंगला येथे यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था शेलघर यांच्या वतीने यमुना स्त्री सन्मान पुरस्कार कार्यक्रमा करिता प्रमुख अतिथी मान्यवर म्हणून उपस्थित राहिलेले माजी खासदार रामशेठ ठाकूर,पनवेल महानगर पालिका आयुक्त गणेश देशमुख, पनवेल महानगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, गरीब रुग्णांकरिता साक्षात देवदूत असणारे गुणे हॉस्पिटलचे संचालक डॉ. गिरीश गुणे,जेष्ठ कामगार नेते आणि काँग्रेस रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्रशेठ घरत,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अतुल पाटील या मान्यवरांच्या शुभहस्ते “यमुना स्त्री सन्मान पुरस्कार” हा मानाचा पुरस्कार सन्मानचिन्ह,प्रशस्तीपत्र,शाल, श्रीफळ आणि मानाच वस्त्र पेशवाई पैठणी देऊन गौरविण्यात आले.सोबतच ह्या पुरस्कार प्रदान सोहळ्यास उपस्थित सृष्टी मुंबईकर हीचे आई - बाबा राजू मुंबईकर, राणीताई मुंबईकर,सुप्रसिद्ध निवेदक नितेश पंडित,सुप्रसिद्ध कोरियोग्राफर पप्पूदादा





सूर्यराव,सुरेंद्र पाटील ही सर्व मंडळी उपस्थित होती.यमुना स्त्री सन्मान पुरस्कार प्रदान सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवरांनी कुमारी सृष्टी मुंबईकर यांचे विशेष कौतुक करून अभिनंदन केले.आणि तिला तिच्या पुढील यशस्वी वाटचाली करिता खूप साऱ्या शुभेच्छा देखील दिल्या. त्याच सोबत ह्या धाडशी क्षेत्रात आपलं करिअर घडवण्यासाठी उज्वल भविष्याची गगन भरारी घेण्याकरिता घेतलेल्या आपल्या धाडशी निर्णयाला पाठिंबा देणारे आणि तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे तिचे आई - बाबा राजू मुंबईकर आणि राणीताई मुंबईकर यांचे सुद्धा सर्व मान्यवरांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले.

# वनविभाग पाटोदा हद्दीतील जंगलातील वन्य पशु-पक्षांसाठी पानवठ्यात पाण्याची सोय

**वादळवार्ता/ पाटोदा**

बीड जिल्हा वनविभाग पाटोदा अंतर्गत पाटोदा हद्दीतील सामाजिक वन विभागात वन्य पशु-पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याचे पानवठे उपलब्ध आहेत.यावर्षी मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच कडक उन्हाळ्याची चाहूल लागलेली आहे.त्यामुळे या वर्षी उन्हाळा कठीण जाणार असल्याचे सांगितले जात आहे.मानवाप्रमाणे व पशु-पक्ष्यांनाही या उन्हाळ्याचा त्रास होणार आहे.जंगलातील पशु-पक्ष्यांची पाण्यावाचून हाल होणार नाहीत यासाठी वन विभागाने आतापासूनच काळजी घेत पाटोदा तालुक्यातील पांगरी,बीड,बेदरवाडी,गवळवाडी श्री. संत भगवान बाबा घाटी या ठिकाणच्या वनातील पशु-पक्षांसाठी तयार असलेल्या पाणवठ्यात दि.११ मार्च २०२४ पासून टँकरने पाणी आणून साठविण्यास सुरू केले आहे.त्यामुळे पशु-पक्षांना सतत पिण्यासाठी पाणी मिळणार आहे.पशु-पक्षांना उन्हाळयात सतत पाणी मिळावे. यासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीकांत काळे यांच्या आदेशावरून वनपाल अजय देवगुडे यांच्या मार्गदर्शनात वनरक्षक गणेश सानप,वनमजूर शेख सत्तार,वन सेवक शहादेव पवार, पोपट गुजर हे परिश्रम घेत आहेत.



# धनंजय रुक्मिणी पंडीतराव मुंडे! महिला धोरणाची अंमलबजावणी अन मुंडेंनी मंत्रालयातील नावाची पाटी बदलली

**वादळवार्ता/मुंबई**

राज्यात नव्याने घोषित करण्यात आलेल्या चौथ्या महिला धोरणातील नियमाची राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी अंमलबजावणी केली असून त्यांनी आपल्या नावामध्ये वडिलांच्या नावाआधी आईचे नाव असलेली पाटी आपल्या मंत्रालयातील दालनामध्ये लावली आहे. त्यामुळे आता धनंजय यांचे संपूर्ण नाव ‘धनंजय रुक्मिणी पंडीतराव मुंडे’ असे नाव असणारी पाटी आता मंत्रालयात लावण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित




दादा पवार तसेच महिला व बालविकास मंत्री कु. अदितीताई तटकरे यांच्या माध्यमातून राज्याचे चौथे महिला धोरण नुकतेच घोषित करण्यात आले. या महिला धोरणामध्ये स्त्री - पुरुष समानतेला विशेष महत्त्व देण्यात आले असून आईचे आयुष्यातील स्थान देखील अधोरेखित करण्यात आले आहे. त्यामुळे आता नव्या धोरणानुसार शासकीय कामकाजामध्ये आपले संपूर्ण नाव लिहिताना वडिलांच्या नावा अगोदर आईचे नाव लिहिण्याची प्रथा नव्याने सुरू करण्यात आली असून याची अंमलबजावणी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केली आहे. धनंजय मुंडे यांच्या मंत्रालयीन दालनात ‘धनंजय रुक्मिणी पंडीतराव मुंडे’ अशा नावाची पाटी डौलाने उभी आहे!

दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

# वादळ वार्ता

## सदानंद प्रधान यांचा वाढदिवस समाजोपयगी उपक्रमांनी साजरा.

माजलगाव.प्रतिनिधी-माजलगाव तालुक्यातील उद्योन्मुख नेतृत्व तथा बहूजन विकास मोर्चाचे युवा नेते सदानंद (भैय्या) प्रधान यांचा वाढदिवसा निमित्ताने १२मार्च मंगळवार रोजी दिवस भरात विविध समाजोपयोगी उपक्रामांनी साजरा करण्यात आला. यात सकाळी ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे रुग्णांना फळांचे वाटप, शहरातील भीमनगर येथील जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहीत्याचे वाटप करण्यात आले. या शिवाय प्रवाश्यांना पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून नविन बस स्थानका समोर पाणपोईची व्यवस्था करण्यात आली. मुकबधीर शाळेतील विद्यार्थांना अन्नदान तसेच देवखेडा येथील गोशाळेतील जनावरांना चारा,पालावरील गोर गरिब लोकांना रेशन किट वाटप करण्यात आले. प्रसंगी बहूजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे ,कृऊबास.चे उपसभापती श्रीहरी मोरे यांच्यासह बविमो.चे शहराध्यक्ष दिपक टाकणखार तसेच अशोक लांडगे,रमेश गवळी,केतन प्रधान,फारुक अण्णा , राहूल मस्के, मंगेश पौळ ,दिपक शिंदे , ज्ञानेश्वर विघ्ने,अमोल जाधव,किशोर रांजवण,आदित्य गायकवाड,सुमीत टाकणखार,सतीश जाधव,गणेश धारक,आदित्य झोडगे आदींची उपस्थिती होती .

# पाटोद्याच्या जय हनुमान क्रिडा मंडळाचा खेळाडू परवेज शेख महाराष्ट्र संघात

**वादळवार्ता/पाटोदा**

तालुक्यातील महासंघ येथील जय हनुमान क्रीडा मंडळाचा खेळाडू याची महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली असल्याने शेख परवेज यांचे तसेच जय हनुमान तुला मंडळाच्या प्रमुखांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे पाटोदा तालुक्यातील महासांगवी येथील हनुमान क्रिडा मंडळाचे शेकडो खेळाडूंनी आतापर्यंत कबड्डी,कुस्ती,खोखो आदी खेळाच्या माध्यमातून राज्यस्तरावर मजल मारली असुन एका मुस्लिम समाजाच्या चहावाल्याच्या नातुला जय हनुमान क्रिडा मंडळाने कबड्डी खेळण्याची संधी दिली त्या संधीचं सोनं करीत शेख परवेझ यांने जय हनुमान क्रिडा मंडळाचे प्रमुख मा.मधुकर (तात्या) गर्जे व प्रशिक्षक मा.प्रमोद गर्जे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धेत चमकदार कामगिरी केल्याने त्याची ३३ व्या किशोर गटातुन कबड्डी या खेळात महाराष्ट्र संघात निवडीवर शिक्कामोर्तब केले असुन त्याच्या निवडीबद्दल विविध स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. पाटोदा शहरातील रहिवासी शेख शब्बीर भाई चहाचा व्यवसाय करतात तर शेख परवेझ यांचे वडील बँकेचे पिग्मी एजंट म्हणून काम करतात आर्थिक परिस्थिती बेताची शालेय जिवनातच शेख परवेझ याला कबड्डी खेळाची आवड होती यामुळे त्यांचे वडील शेख असलम यांनी शेख परवेज यास महासांगवी येथील जय हनुमान क्रिडा मंडळात प्रशिक्षणासाठी पाठविले असता तेथे मा.मधुकर (तात्या) गर्जे व प्रशिक्षक मा.प्रमोद



गर्जे सर यांचे योग्य मार्गदर्शन मिळाले शेख परवेझ यांने विविध स्पर्धेत भाग घेऊन उत्कृष्ट कामगिरी केली महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मान्यतेने व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमान पदाखाली लोकसेवा प्रतिष्ठान, ता.हवेली जिल्हा पुणे यांच्यावतीने ३४वी किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा दि.२४ ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळा,फुलगाल ता.हवेली जि.पुणे येथे संपन्न झाली या निवड स्पर्धेत शेख परवेझ याने चमकदार कामगिरी केल्याने भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या मान्यतेने व बिहार राज्य कबड्डी असोसिएशनच्यावतीने दि.१६ मार्च ते १९ मार्च २०२४ या कालावधीत ३३ वी किशोर गट राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा मोतीहरी,चंम्पारन बिहार येथे आयोजित स्पर्धेत शेख परवेझ याची महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे.या निवडीबद्दल शेख परवेझ यांचे जय हनुमान क्रिडा मंडळाचे मधुकर गर्जे, महेंद्र गर्जे,प्रशिक्षक प्रमोद गर्जे सर,सरपंच नामदेव सानप, राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते रामकृष्ण बांगर,.जि.प.मा. अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला,पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष राजु जाधव,युवानेते विजयसिंह बाळा बांगर,सय्यद बंडा शहानवाज, योगेश सानप आदींसह तालुक्यातील राजकीय, सामाजिक, व्यापारी, डॉक्टर, वकील, शिक्षक, आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

# सार्वजनीक बांधकाम विभाग व माजलगांव नगर परिषदेचा सावळा गोंधळ

## एकाच कामाच्या दोन वर्कऑर्डर , नाहरकत रद्द करा - सचिन जावळे

**दैनिक वादळ वार्ता**

माजलगांव : ( ) शहरातील प्रभाग क्र.२ मधिल रोडच्या कामाची वर्कऑर्डर रद्द करण्याची मागणी येथील भारतीय जनता पार्टी दलित मोर्चाचे शहराध्यक्ष सचिन जावळे यांनी मुख्याधिकारी माजलगांव यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगांव यांच्या कडे दोन महाशयांनी एकाच रस्त्याच्या कामाची वेगळ्या पध्दतीने अहवाल तयार करून कामाची मागणी केली , त्यावर कुठलीही शाहनिशा न करता दोन्ही कामांना सार्वजनीक बांधकाम वीभागाकडून कामाची वर्कऑर्डर



देण्यात आली. अन् त्याही पूढे नगर परिषद माजलगांव यांनी स्थळ पाहणी न करताच दोन्ही कामांना नाहरकत देवून मोकळं केलं असल्याचा आरोप करत सदरील रस्त्याचे काम हे नगर परिषदेच्या माध्यमातून आगोदरच झालेलं आहे. सरळ - सरळ हि शासनाची फसवणूक होत असून शासनाच्या निधीचा गैरवापर केला जात असल्याने सदरील कामाची नाहरकत तात्काळ रद्द करण्याची मागणी भारतीय जनता पार्टी दलित मोर्चा चे शहराध्यक्ष सचिन जावळे यांनी निवेदना द्वारे केली असून लवकरात लवकर अंमलबजावनी करण्याची मागणी केली आहे. माजलगांव नगर परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कुणाचंही नियंत्रण राहीलेलं नाही म्हणूनच हा सर्व सावळा गोंधळ बिनबोभाट पणे चालु असल्याचे जावळे यांनी सांगीतले.

## धारुर येथे जरांगे पाटलांचा 14 मार्चला संवाद दौरा. उपस्थित राहण्याचे आवाहन

**वादळवार्ता/किल्लेधारूर**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील हे दि. १४ मार्च रोजी दुपारी धारूर शहरात संवाद दौऱ्यावर येत आहेत, गरजवंत मराठा समाज बांधवाशी संपर्क साधणार आहेत तरी या संपर्क दौऱ्यास मोठ्या संख्येने समाज बांधवानी उपस्थित राहण्याचे आवाहन सकल मराठा समाजाचे वतीने करण्यात आले आहे.

धारूर शहरात मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील हे शहर व तालुक्यातील सकल मराठा समाज बांधवाशी संपर्क साधण्यासाठी "संवाद यात्रा" घेऊन येत आहेत. दि. १४ मार्च रोजी सकाळी ठीक १२ वाजता संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले असून शहर-तालुक्यातील सकल मराठा-बहुजन समाज बांधवांसोबत सविस्तर संवाद साधणार आहेत ,त्यांच्या या दौऱ्याचे उत्कृष्ट नियोजन करण्यात येणार असून या संवाद दौ-यात समाज बांधवानी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे आवाहन सकल मराठा समाजाचे वतीने करण्यात आले आहे.

## मराठा आरक्षण संवाद यात्रेसाठी बहुजन नेत्यांनी थोपटले दंड सादोळा येथे बहुजन नायक बाबुराव पोटभरे यांचे जंगी स्वागत

**वादळवार्ता**

माजलगाव( प्रतिनिधी ) मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने मनोज रंगे पाटील महाराष्ट्र संवाद यात्रा राबवत आहेत मराठाआरक्षण मुद्दा ओबीसी बांधवांच्या विरोधात नाही सत्तेच्या विरोधात आहे मराठा समाजातील गोरगरिबांना आर्थिक मागास असलेल्या मराठ्यांना आरक्षण मिळावे ही गोष्ट सरकार सोबत लावून धरत जरांगे पाटलांनी महाराष्ट्रभर संवाद यात्रा सुरू केली मराठा समाजाचा हाच मुद्दा लक्षात घेता गरीबो के मसीहा, बहुजन नायक बहुजन बादशहा बाबुराव जी पोटभरे साहेब यांनी मराठा आरक्षणासाठी लढत असलेल्या जरांगे पाटलाची खंबीर साथ देण्याचा निश्चय केला आहे या अनुषंगाने जरांगे पाटील लातूर दौऱ्यावर असताना ही मराठा आरक्षणाचे खिंड लढवण्याचे काम बाबुरावजी पोटभरे यांनी केल्याचे बीड जिल्ह्यात दिसून आले बाबुरावजी पोटभरे हे घटनेचे अभ्यासक आहेत बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसामान्यांसाठी रोटी कपडा और मकान आधी गोष्टींसाठी लढा दिला त्यांच्याच विचारावर पावले टाकत आजच्या घडीत सत्तेला लाथ मारून गोरगरीब मराठ्यांचा हक्कासाठी लढतात लढताना दिसतात बाबुरावजी पोटभरे साहेब स्वतःची टीम स्वखर्चाने घेऊन आज फिरताना दिसले त्यांच्यासोबत त्यांचे खंबीर साथीदार श्रीहरी नाना मोरे, भीमराव आप्पा टाकणकर, प्रदीप पटेकर आधी मावळे उपस्थित होते छत्रपती शिवाजी महाराज लढायला जाताना ज्याप्रमाणे आपल्या त्याकाळच्या शत्रू सोबत लढण्यासाठी अनेक सहकार्याची साथ घेत होते त्याप्रमाणेच आजच्या हुकूमशाही सरकार विरोधातील खिंड लढवण्यासाठी सत्तेवर लाथ मारून सत्याची साथ देण्याचा मनोदय पोटभरे यांचा दिसून येत आहे महाराष्ट्रात एकीकडे सत्ता चाखायला मिळावी म्हणून अनेक मराठा नेते एकनाथ शिंदे, फडणवीस, अजित पवार यांचे लागुल चालन करताना दिसतात फक्त बूट पॉलिश करणे बाकी आहे एवढी हुजरे गिरी मराठा नेत्याकडून दिसून येत असल्याने मराठा नेत्यावरील विश्वास मराठा तरुणाई कडून संपुष्टात येत आहे याचाच प्रत्यय आज सादोळा तालुका माजलगाव येथे पाहायला



मिळाला बाबुरावजी पोटभरे टीम सह सादोळा गावात संवाद साधण्यासाठी येत आहेत हे पाहून त्यांच्या स्वागतासाठी गावातील लहान थोर महिला तरुण म्हातारे माणसं मोठ्या संख्येने उपस्थित राहील पोटभरे सारखा माणूस आमच्या न्याय हक्कासाठी लढा देत आहे हे पाहून अनेकांचा आनंद खूप मोठा होता सकल सादोंळा गाव स्वागतासाठी उपस्थित होता या वेळी मराठा आरक्षण मिळवून घेऊ या लढाई वेळी गुन्हे दाखल झाले असतील होतील त्या गोष्टीला भ्या यचं नाही तुम्ही एक पाऊल पुढे चालला तर मी दहा पावले पुढे टाकल मी सदैव तुमच्या सोबत राहील असे सांगून पोटभरे यांनी तरुणांचे मनोबल वाढवत जागृती निर्माण करण्याचे काम केले यावेळी भाजपा ज्येष्ठ नेते बबनराव सोळंके नटू तात्या सोळंके शाहाजी सोळंके विश्वासराव सोळंके भास्कर बाबा सोळंके विश्वंभर सोळंके शरद शिंदे कृष्णा सोळंके लहू तात्या सोळंके सुनील निंबाळकर शुभम सोळंके योगेश सोळंके कृष्णा सोळंके ओमकार सोळंके सोमेश्वर सोळंके प्रमोद सोळंके युवराज कंकळ सिद्धेश्वर सोळंके संतोष सोळंके लक्ष्मण निंबाळकर वसंत सोळंके दामू एरंडे लखन सोळंके पप्पू सोळंके गणेश सोळंके गजानन सोळंके वेदांत सोळंके इत्यादीसह मोठ्या प्रमाणात गावकरी उपस्थित होते

# बार्टीला ४०० कोटी रुपये अनुदान द्या! - अक्षय गोटेगावकर

## वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलन यांची एकाच वेळी राज्यभरातून मुख्यमंत्र्यांकडे मागणी.

**वादळवार्ता/पुणे**



बार्टीची २०२० ते २०२४ पर्यंतची फेलोशिप वितरीत न केल्यामुळे आणि स्पर्धा परीक्षा क्लासेस, समतादूत, स्कील डेव्हलपमेंट, शिष्यवृत्ती, फेलोशिप व नेट साठी निधी कमी पडत असल्याने वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलनचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सल्लागार समितीच्या अध्यक्षा अंजलीताई आंबेडकर सदस्य महेश भारतीय सर यांच्या नेतृत्वात राज्यभर आंदोलने करण्यात आली. याच धरतीवर पुणे शहर व जिल्हा कार्यकारिणीने पुणे जिल्हा अधिकारी यांची भेट घेवून त्यांच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले.

महाराष्ट्रातील फुले - शाहू आंबेडकर विचारधारेच्या संस्था, संघटना, पक्ष यांच्या रेट्यामुळे ओबीसी समूहासाठी 'महाज्योती', मराठा समूहासाठी 'सारथी' ची निर्मिती करण्यासाठी सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या अनेक प्रयत्नामुळे आणि आंदोलनामुळे महाराष्ट्र शासनाने बार्टीच्या धर्तीवर 'सारथी' आणि 'महाज्योती' ची निर्मिती केली. बार्टी या संस्थांची मातृसंस्था आहे. परंतु आरक्षित वर्गाच्या लाभार्थ्यांमध्ये सरकार आता दुजाभाव करीत आहे.

महाराष्ट्र शासनाने 'सारथी' आणि 'महाज्योती' या संस्थांना ३६५ कोटी रुपये दिले आणि बार्टीला फक्त ७५ कोटी रुपये देण्यात आले आहेत. हा जो आरक्षित वर्गाच्या लाभार्थ्यांमध्ये महाराष्ट्र शासन दुजाभाव करीत आहे, तो भारतीय राज्य घटनेच्या मार्गदर्शक तत्वांची पायमल्ली आहे.

सारथी, महाज्योती च्या निर्मितीसाठी ज्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी आंदोलने केली. त्याच मुलांची सर्वांगीण वाढ रोखण्याचे काम बजेट मध्ये कपात करून शासन करीत आहे. आरक्षित वर्गाच्या लाभार्थ्यांमध्ये भांडणे लावण्यापेक्षा बार्टीला वाढीव निधी म्हणून ४०० कोटी रुपये देऊन, हा भेदभाव महाराष्ट्र शासनाने संपवावा अशी मागणी सम्यक विद्यार्थी आंदोलन पुणे शहर व जिल्ह्याच्या वतीने पुणे जिल्हाधिकारी यांच्यासह राज्यभरातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे. अशी माहिती सम्यकचे रोहित भोसले यांनी दिली.

यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे पुणे जिल्हा निरीक्षक अक्षय गोटेगावकर, अ.नगर जिल्हा निरीक्षक राहुल जगताप, सातारा जिल्हा निरीक्षक रोहित भोसले,शहरध्यक्ष चैतन्य इंगळे, मा.जिल्हा उपाध्यक्ष विकी अवचार, फर्ग्युसन कॉलेज अध्यक्ष स्नेहा इंगोले, महासचिव रोहन वाघमारे, YCLC निरीक्षक बुद्धप्रिया जगताप, प्रणिती क्षिरसागर तसेच आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिझाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )